# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

Original Article

# वरोरा तालुक्यातील पीक विम्यामुळे शेतीच्या उत्पादनावर झालेला परिणाम

**दिलीप भीमराव मेंढे[1], डॉ. विजय वि.टोंगे[2]**

[1]संशोधक,डॉ.खत्री महाविद्यालय तुकुम, चंद्रपुर (म.रा)

[2]मार्गदर्शक, विवेकानंद महाविद्याल,भद्रावती, चंद्रपुर (म. रा)

**Email:** dilipmendhe05@gmail.com

**Manuscript ID:** JRD -2025-171119

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 11(A)

Pp. 115-118

November. 2025

**Submitted:** 17 Oct. 2025

**Revised:** 27 Oct. 2025

**Accepted:** 10 Nov. 2025

**Published:** 30 Nov. 2025

***सारांश***

*वरोरा तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकांचा प्रमुख व्यवसाय हा शेती असून आज शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणामध्ये अडचणी निर्माण होताना दिसून आल्या वरोरा तालुक्यात एकूण १७९ ग्रामीण भाग असून वरोरा तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ १०२९ $km^2$ असून एकूण लोकसंख्या १,७१,५४०आहे. ही लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार दिली आहेत. या सर्व गावातील शेतकऱ्यांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे या शेतकऱ्यांना आता मोठ्या प्रमाणामध्ये अडचणी भाजताना दिसल्या परंतु शेतकऱ्यांनी पिक विमा योजनेचा फायदा घेऊन आर्थिक संकटाला तोंड देण्यास धैर्य दाखवले सर्व शेतकऱ्यांनी पिकाची लागवड केल्यानंतर मशागती झाली परंतु त्यानंतर शेतकऱ्यांच्या पिकांवर नैसर्गिक आपत्तीमुळे त्यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले त्यामुळे हा वर्ग संकटात आलेला दिसून आला या वर्गांना थोड्याफार प्रमाणात दिलासा मिळण्याचे काम पिक विमा च्या माध्यमातून करण्यात आले सरकारच्या माध्यमातून सर्व शेतकऱ्यांना पिक विमा हप्ता देण्यात येत आहेत त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होते म्हणून हा शेतकरी आपल्या शेतीसाठी वेगवेगळ्या पिकाची लागवड करण्याकरिता थोड्याफार प्रमाणामध्ये सक्षम झालेला आहे या शेतकऱ्याला विविध प्रकारच्या योजनेचा लाभ घेण्याकरिता सरकारने आखून दिलेल्या नियमाचे पालन करावे लागत असून सर्व शेतकऱ्यांनी त्या योजनेचा लाभ घ्यावा.*

***बीज शब्द:*** *व्यवसाय ,शेतकरी, आपत्ती ,दिलासा, माध्यमातून, आर्थिक स्थिती.*

**प्रस्तावना**

चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यामधील खेड्या भागातील अनेक शेतकरी शेती करण्याकरिता वेगवेगळया साधनांचा वापर करीत ग्रामीण भागामधील शेतकरी बहुतांश पारंपारिक पद्धतीने शेती करण्याचा प्रयत्न करीत आजच्या आधुनिक काळामध्ये खेडोपाडी शेती करीत असताना शेतकरी हा नवीन तंत्रज्ञानाचा वापर करीत असतो पण या तंत्रज्ञानाचा वापर करीत असताना शेतकऱ्यांना आर्थिक दृष्टिकोनातून अनेक अडचणी निर्माण होतात वरोरा तालुक्यात लहान लहान खेड्यामध्ये अनेक भागात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले दिसून या भागात कापूस,सोयाबिन, तुर, गहू हरभरा, हरभरा, मिरची, इत्यादी लहान लहान पिकांचे उत्पादन शेतकरी करीत आहेत. परंतु गेल्या काही वर्षात करण्यात आलेली शेती आणि आज करण्यात आलेली शेती यामध्ये तफावत आढळून आली शेतीही नैसर्गिक घटकांवर अवलंबून असणारे शेतकरी जवळ जवळ 70 ते 80 टक्के हे निसर्गावर अवलंबून असणाऱ्या म्हणून त्यांना होणारे उत्पादन हे निसर्गाच्या हाती आहे. शिवाय शेतकऱ्यांना मिळणारे साधन मुबलक स्वरूपाचे नसून मर्यादित स्वरूपाच्या त्यात शेतकऱ्यांना निर्माण होणारी आर्थिक समस्या मोठ्या प्रमाणात समस्या आहेत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**

*दिलीप भीमराव मेंढे, संशोधक, डॉ.खत्री महाविद्यालय तुकुम, चंद्रपुर (म.रा.)*

**How to cite this article:**

*मेंढे, . दिलीप . भीमराव ., & टोंगे, . विजय . वि . (2025). वरोरा तालुक्यातील पीक विम्यामुळे शेतीच्या उत्पादनावर झालेला परिणाम. Journal of Research and Development, 17(11(A)), 115–118.*
*https://doi.org/10.5281/zenodo.17877176*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.17877176

OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

लहान शेतकऱ्यांना पिक विमा मुळे आर्थिक मदत होण्यास मदत झाली परंतु पाहिजे त्या प्रमाणात उत्पादन न झाल्यामुळे हा शेतकरी वर्ग आर्थिक दृष्ट्या कर्जाच्या दडपणाखाली आलेला आहे.म्हणून हा शेतकरी वर्ग आज सुखी झालेला दिसून येत वेगवेगळया गावांमध्ये वेगवेगळे शेतीचे प्रमाण दिसून शिवाय काम करणाऱ्या प्रत्येक गावामधील माणसांची मानसिक स्थिती देखील वेगवेगळी दिसून अशा प्रत्येक गावांना भेटी दिल्यानंतर शेतकऱ्यांचे वेगवेगळे मत आढळून काही शेतकऱ्यांचे सकारात्मक मत तर काही शेतकऱ्यांचे नकारात्मक मत आढळून आले त्यामुळे सरकारच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या विम्याचा फायदा सर्वच शेतकऱ्यांना होत आहे की नाही असे विचारपूस केले असता काही शेतकऱ्यांना याचा फायदा दिसून आलेला याचे कारण म्हणजे शेतकऱ्यांचे अज्ञानपणा आणि अपुरी माहिती असल्याचे आढळून तरी देखील विम्याचा फायदा 80 ते 90 टक्के लोकांना होताना दिसून आला म्हणून पीक विम्याचा उत्पादनावर सकारात्मक परिणाम झालेला दिसून आला.

**संशोधन क्षेत्र**

२०२४-२०२५या कालावधीमधील वरोरा तालुक्यातील भटाळा, जामनी,पीजदुरा,सालोरी आणि टेंभुर्डा या पाच गावातील एकूण शंभर शेतकऱ्यांचा पिक विम्याचा लाभ घेतला आहे. त्या शेतकऱ्याचा आढावा घेण्यात आलेला आहे. वरील विषयासंदर्भात पाच गावातील फक्त शंभर शेतकऱ्यांचा अहवाल यात घेण्यात आलेला आहे.

**संशोधन पद्धती**

वरील विषयाचे संशोधन करीत असताना प्रत्यक्ष मुलाखत घेऊन सर्वेक्षण पद्धतीने माहितीचे संकलन करण्यात आले तसेच प्रत्यक्ष अप्रत्यक्ष माहिती गोळा करून वरील विषयावर अभ्यास करण्यात आला. यात प्रकाशित, अप्रकाशित, लिखित , संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके आणि इंटरनेटचा वापर करण्यात आला.

**संशोधनाचा उद्देश**

१. शेतकऱ्यांच्या समस्यांचे अध्ययन करणे.
२.विम्याचा उत्पादकावर झालेला आर्थिक परिणाम अभ्यासणे.
३. विमा घेताना निर्माण होणाऱ्या अडचणी जाणून घेणे.
४. विम्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये झालेला बदल जाणून घेणे.
५. शेतकऱ्यांचे विमा संबंधित वैयक्तिक मत जाणून घेणे.

**संशोधनाची गृहितके**

१. उत्पादकांवर सकारात्मक परिणाम होताना दिसून आला.
२.आर्थिक नुकसानी पासुन मदत होताना दिसते.
३ विम्याचा लाभ घेताना अडचणींना सामोरे जावे लागले.
४. योजनेचा लाभ घेताना शेतकरी नुकसान भरपाई बाबत समाधानी नसतात.
५. योजनेचा लाभ घेताना सहभाग होणाऱ्यांची संख्या कमी आह

**पिक विम्यामुळे उत्पादनावर झालेला परिणाम**

पिक विमा योजनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यावर जे नुकसान झाले त्याचे दोन प्रकारे परिणाम होताना दिसते.

**(अ) सकारात्मक परिणाम:**

**१.लोकांना आर्थिक स्थिरता मिळाली :-**

निसर्गाच्या अनियमित बदलामुळे पिकांची उत्पादन क्षमता कमी झाली त्यामुळे त्यांच्या पिकाच्या उत्पादनात होणारे मोठे आर्थिक नुकसान टाळता यावे, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक सुरक्षा मिळते आणि त्यांना आपल्या कुटुंबातील इतर गरजा पूर्ण करण्याकरिता त्यांना आर्थिक स्थिरता मिळाली.

**२.शेतीच्या उत्पादनात वाढ :-**

गावात विमा संरक्षणामुळे शेतकरी नवीन आणि चांगल्या पद्धतींने शेती करून शेतीच्या उत्पादनात वाढ करून गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित होतात. शेतामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या उत्पादनात वाढ होत आहे.त्यामुळे पीक उत्पादन क्षमता वाढण्यास मदत होते.

**३.नुकसान भरपाई :-**

मालांची पेरणी केल्यानंतर विविध प्रकारच्या अडचणी निर्माण होतात जसे चक्रीवादळ, अवकाळी पाऊस, दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्त्यांमुळे पिकाचे पेरणीपूर्व किंवा काढणीनंतरचे नुकसान झाल्यास विमा नुकसान भरपाई देतो. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली.

**४.जोखीम कमी होणे :-**

नैसर्गिक तसेच मानवनिर्मित साधनांमुळे होणारी जोखीम शेतकऱ्यांच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे जसे की हवामानातील बदल होणाऱ्या नुकसानी पासून मदत व्हावी त्याकरिता नुकसाननीची भरपाई मिळते. त्या माध्यमातून निर्माण शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण कमी होतो.

**५.शाश्वत शेतीला मदत :-**

विमा योजनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर ठेवण्यास मदत होते . कृषी क्षेत्रातील शाश्वत उत्पादनाला समर्थन मिळते. आणि शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळतो.

वरोरा तालुक्यातील काही शेतकऱ्यांना विचारणा केली असता प्रत्यक्ष सामुग्री ची माहिती पुढील पाच गावातील शेतकऱ्यांनी पीक विम्याचा लाभ घेण्यात आला आहे असे सांगितले त्याची माहिती पुढील सारणीत दर्शवण्यात आली आहे.

**विम्याचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांचे विश्लेषणात्मक सारणी**

| अ.क्र. | गावांची नावे | लाभ घेणारे लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | भटाळा | १७ | १७.००% |
| २ | जामणी | २४ | २४.००% |
| ३ | पीजदुरा | १६ | १६.००% |
| ४ | सालोरी | १८ | १८.००% |
| ५ | टेंभुर्डा | २५ | २५.००% |
| | एकूण | १०० | १००% |

वरील सारणीवरून असे निर्देशनास येते की, एकूण १०० उत्पादककाला विचारांनी केली असता अनुक्रमे पाच गावातील १०० शेतकऱ्यां पैकी सर्व शेतकऱ्यांनी सकारात्मक उत्तरे मिळाली आहे. नमुण्यामध्ये घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांनी सकारात्मक उत्तर दिले आहेत. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना विम्याचा 100% फायदा झालेला आहे असे स्पष्ट दिसून आले आहे.

**(ब)नकारात्मक परिणाम**

**१.अचूकतेचा अभाव :-**

शेतीमध्ये पीक कापणी प्रयोगांमधील त्रुटींमुळे रक्कम त्वरित भरपाईवर परिणाम होऊ शकले नाही.त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली. पण काही शेतकऱ्यांना उशिरा या योजनेचा फायदा घेता आला.

**२.विमा भरपाई मिळण्यास विलंब:-**

काही शेतकऱ्यांनी पीक विम्याचा दावा उशिरा भरला, कागत पत्राची पूर्तता योग्य वेळी झाली नाही.विशेषतः बागायत पिकांच्या बाबतीत, नैसर्गिक आपत्तीनंतरही भरपाई मिळण्यास विलंब होतो, ज्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

**निष्कर्ष**

नैसर्गिक आपत्ती आणि इतर कारणामुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले आहे. त्यापासून शेतकऱ्यांना आर्थिक लाभ व्हावा मदत व्हावी या उद्देशाने शेतकऱ्यांनी पिकविण्याचा वापर करून आपली आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होते. शेतीमध्ये होणाऱ्या उत्पादनापासून लाभ घेण्याकरिता या योजनेचा वापर केला जातो. वरोरा तालुक्यातील घेण्यात आलेल्या पाच गावातील शेतकऱ्यांचा अभ्यास केल्यानंतर हे लक्षात आले की संशोधनासाठी निवडण्यात आलेली ग्रामीण भागातील खेड्यातील लोकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे ती गावी म्हणजे भटाळा, जामणी, पीजदुरी, सालोरी आणि टेंभुर्डा या पाच गावातील १०० लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांची निवड करण्यात आली त्यातून असे निष्कर्ष निघाली की या योजनेचे सर्व शेतकऱ्यांनी सकारात्मक उत्तरे देण्यात आले. त्यामुळे या योजनेचा फायदा घेऊन आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे असे स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ**

1. वाणी निता, (२०१५),कृषी अर्थशास्त्र जळगाव, प्रशांत पब्लिकेशन.
2. कविमंडन विजय,(२०१४), कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर.
3. बोधनकर सुधीर, (२०२३), सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन ,नागपूर.
4. आगलावे प्रदीप, (२०००), संशोधन पद्धती व तंत्रे, विद्या प्रकाशन ,नागपूर.
5. http://www.agres.gov.in
6. www.indiaagree.com
7. www.sheti.com
8. http:llicarsri.res.in/
9. www.agreetrust.org
10. http://gr.maharashtra.gov.in